# संकृत भाषा विभागाच्या वतीने वक्तृत्व स्पर्धा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्रातर्फे दर वर्षीप्रमाणे याही वर्षी शालेय आणि महाविद्यालयीन पातळीच्या संकृत स्तोत्रपठन आणि वक्तृत्व यांच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये 160 पेक्षा जास्त मुलांनी भाग घेतला होता. पारितोषिक वितरण समारंभाला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन आणि जर्नालिझम विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. केशव साठ्ये हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .

